अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

A Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)



Affiliation Section

जाक्रं.कबचौउमवि/5/294/2026. दि. 5/10/2026.

**अत्यंत महत्त्वाचे**

**प्रति,**
मा.प्राचार्य,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव संलग्नीत सर्व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये यांना

**विषय:-** शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून बी.फार्मसी आणि डी.फार्मसी अभ्यासक्रमांच्या नविन संस्था सुरू करणे आणि विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थामधील सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढ करण्याबाबत.

**संदर्भ:-** १.महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्र.मान्यता-२०२६/प्र.क्र.६२५/ई-१७४१४११/ तांशि-४, दि. ९ जुलै २०२६.
२.तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. २/एनजीसी/PCI/नविन संस्था व प्रवेशक्षमता वाढ/२०२६/५५६, दि. २० जुलै २०२६.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७६ मधील तरतुदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली "महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची" बैठक दि. १४ मे २०२६ रोजी झाली. सदर बैठकीत औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या २०२५-२०३१ करीताच्या बृहत आराखडयास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यात बी.फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमांच्या नविन संस्था सुरू करण्यात येवू नये तसेच विद्यमान संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढविण्यात येवू नये असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थामधील बी.फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढ तसेच बी. फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमाची नविन संस्था सुरू करण्यास मान्यता देता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे.

सोबत:- शासनाचे दि. ९ जुलै २०२६ व २० जुलै २०२६ चे पत्र

आपला विश्वासू

(डॉ.विनोद प्र.पाटील)
कुलसचिव

"जनहिताय सर्वदा"

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

था मजला ४, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .०३२ ४०० -

दूरध्वनी क्र.०२२०४०९३५. Email ID: tashi4-hted@mah.gov.in

---

क्र.मान्यता-२०२६/प्र.क्र.६२५/ई-१७४१४११/तांशि-४ दिनांक : ०९ जुलै, २०२६.

ई-मेलद्वारे

प्रति,

संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यात नवीन बी.फार्मसी आणि डी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्थांना द्यावयाच्या विविध मान्यतांबाबत...

संदर्भ:- आपले पत्र क्र.२/मान्यता/फार्मसी संस्था परवानगी/२०२६/२९७, दि.२६.०५.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्रान्वये आपण औषधनिमाणशास्त्र संस्थांच्या विविध मान्यतेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७६ मधील तरतुदीनुसार मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची बैठक दि.१४.०५.२०२६ रोजी झाली. सदर बैठकीत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२५ ते २०३१ करिताच्या बृहत आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यात नवीन बी.फार्मसी आणि डी.फार्मसी संस्था सुरु करण्यात येऊ नयेत, तसेच, विद्यमान संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता वाढविण्यात येऊ नये, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधीन प्रस्तावातील प्रपत्र-अ, प्रपत्र-ब तसेच, प्रपत्र-क मध्ये नमूद औषधनिर्माणशास्त्र संस्थांना अनुक्रमे बी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे, विद्यमान संस्थेत नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम सुरु करणे तसेच, नवीन डी.फार्मसी संस्था सुरु करणे याकरिता शासन मान्यता देता येणार नाही. तरी, सदर बाब तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्तरावरुन परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही तात्काळ करावी, ही विनंती.

आपला,

(अनिल चौरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती (तांशि-४)

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७३५६/४९२/४४२/४४३
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक: २/एनजीसी/PCI/नवीन संस्था व प्रवेशक्षमता वाढ/२०२६/ ५५८ दिनांक : 10 JUL 2026

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यात बी.फार्मसी आणि डी.फार्मसी अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करणे व विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढ करण्याबाबत..

संदर्भ : १) शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२६/ई १६४९६१५/विशि-५, दि.२५.५.२०२६.
२) शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक मान्यता-२०२६/प्र.क्र.६२५/ई १७४१४११/तांशि-४, दि.९.७.२०२६.

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७६ मधील तरतूदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली, "महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाची" बैठक दि. १४ मे, २०२६ रोजी झाली. सदर बैठकीत औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या २०२५-२०३१ करिताच्या बृहतआराखडयास मान्यता देण्यात आली आहे. सदर बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यात बी. फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरू करण्यात येऊ नयेत तसेच विद्यमान संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशक्षमता वाढविण्यात येऊ नये, असा निर्णय झालेला आहे. (सोबत प्रत संलग्न)

उपरोक्त बाब विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शैक्षणिक वर्ष २०३०-३१ या कालावधीत राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र संस्थांमधील बी. फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश क्षमता वाढ तसेच बी. फार्मसी आणि डी. फार्मसी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास मान्यता देता येणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
(प्र-कुलगुरु कार्यालय)
आ.क्र.: 8324

Affl No. 1258 29/9/26

Affiliation

( डॉ. प्रमोद नाईक )
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी-
१. कुलसचिव, सर्व संबंधित विद्यापीठे. २. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई.
३. सर्व औषधनिर्माणशास्त्र संस्था.
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
५. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.